**MHNS280002862023**

<u>विशेष दिवाणी दावा क्र.२६७/२०२३ मधील निशाणी क्र.२९ वरील आदेश</u>.

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी सदरहु दाव्यात त्यांना मयत वादी गंगाधर दगडु भवार यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी केलेला आहे. ते असे नमुद करतात की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरूध्द खरेदीखत रद्द करून मिळण्यासाठी व निरंतर ताकिद मनाई हुकूमासाठी व अन्य दादींसाठी दाखल केलेला आहे. वादी गंगाधर दगडु भवार हे दि.२९/०९/२०१७ रोजी गावी मयत झाले. तसेच सदर दाव्यात यापुर्वी वादीचे वडील गंगाधर दगडु भवार यांनी दिलेले वकिलांनी दाव्याची माहिती व तारीख दिलेली नसल्याने व वादी वारस हे मागासवर्गीय कुटुंबातील असुन आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे सदर बाबत वादीचे वारसांना वारस मुदतीत दाखल करावे लागतात याची माहिती नव्हती. वादीच्या वारसांनी मुद्दामहुन सदरु दाव्यात वारसांचा अर्ज उशिराने दिलेला नाही. सदरचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु सदरचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीच्या वारसांचे अपरिमित असे नुकसान होईल व वादी हे त्यांच्या न्याय हक्कांपासुन वंचित राहतील. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर करण्यात येवुन वादीच्या वारसांना दाव्यात रेकॉर्डवर घेण्याची परवानगी मिळण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. याउलट प्रतिवादींतर्फे विद्वान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी कथन करतात

की, वादीचा अर्ज मुदतीत नाही, अर्जात नमुद कारण योग्य नाही. सबब अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

**३.** मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता वादीचे वारस अभिलेखावर येणे न्यायोचित ठरेल. वादीने सदर वारस अभिलेखावर घेण्यास जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. सदर कथन व प्रतिवादींचा आक्षेप विचारात घेता माझ्या मते वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.२९ मंजुर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब हा वादीने प्रतिवादी यांना खर्च रक्कम रु.५००/— पाचशे रूपये मात्र) देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

SACHIN HINDURAO KHADE

Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2026.04.28 13:53:25 +0530

सिन्नर.
दिनांक :— २८/०४/२०२६.

(सचिन एच. खाडे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सिन्नर

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are same, word to word as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. Bharati D. Uphade, Stenographer (Grade-II) |
| Name of the Court | : | Civil Judge Senior Division, Sinnar. |
| Dictated on | : | 28/04/2026 |
| Transcribed on | : | -- |
| Checked on | : | 28/04/2026 |
| Signed on | : | 28/04/2026 |
| PDF uploaded on | : | 28/04/2026 |